Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

April 2021

Special Issue 265




**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | A Comparative Study of Sports Emotional Intelligence Between Rural & Urban Female Wrestling Players of Nashik | Dr. Manish Deore | 135 |

## हिंदी विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | आदिवासी समाज का अस्तित्व | अप्पासाहेब जगदाले | 138 |
| 27 | संत कबीरदास के काव्य में युग चेतना | प्रा.हिरा पोटकुले | 141 |
| 28 | कबीर वाङ्मय और उसकी प्रामाणिकता | डॉ. महेन्द्रसिंह पवार | 145 |
| 29 | विद्यापति का साहित्य 'विभागसार' - स्त्रीधनाधिकार और उपयोग - वर्तमान परिप्रेक्ष्य में। | डॉ. प्रियंका कुमारी | 149 |
| 30 | अमृता प्रीतम के अनुदित उपन्यासों में प्रेम का स्वरूप | डॉ. शोभा रावत | 156 |
| 31 | स्त्री जीवन और सुधा ओम ढींगरा की कहानियाँ | अनिता देवी | 167 |
| 32 | विश्व पटल पर हिंदी की स्थिति और प्रासंगिकता | डॉ. विष्णु राठोड | 171 |
| 33 | हिंदी काव्य साहित्य में व्यष्टी - समष्टी : बोध, अर्थ एवं स्वरूप | डॉ. जगदीश परदेशी | 176 |
| 34 | मंदिर के बदले सेवाश्रम बनाने का संदेश देती कहानी - 'फाइल' | डॉ. गजानन भोसले | 181 |
| 35 | थारु जनजाति का आर्थिक, सामाजिक एवं ऐतिहासिक अध्ययन | डॉ. विमला देवी | 187 |
| 36 | फादर पीटर पॉल एक्का के कहानी साहित्य में आदिवासी चेतना : 'राजकुमारों के देश में' इस कहानी संग्रह के विशेष संदर्भ में | प्रा. हर्षल बच्छाव, डॉ. अनीता नेरे | 196 |
| 37 | हिन्दी ग़ज़ल में फ़िक्र और ज़िक्र | डॉ. जियाउर रहमान जाफरी | 201 |
| 38 | वैश्विक आचारसंहिता : एक तात्विक चिंतन | डॉ.राजेसाहेब मारडकर | 205 |

## मराठी विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| 39 | आदिवासींच्या विकासाकरिता महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना : उद्देश व स्वरूप | डॉ. चंद्रकांत गोंधळी | 211 |
| 40 | वारकरी साहित्यातील अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार | श्री. जालिंदर येवले | 217 |
| 41 | संत नामदेवांची समाजाभिमुखता | प्रा. डी. एम. वडूरे | 222 |
| 42 | जोगियाची महारी : संत सोयराबाई | डॉ. प्रमोद गारोडे | 225 |
| 43 | किशोर सानप लिखित 'समग्र तुकाराम दर्शन' : एक साक्षेपी स्वरूपाची मांडणी | प्रा. बालासाहेब कटारे | 231 |
| 44 | सातवाहन कालीन चित्रकला | डॉ. जी. एस.पाटील | 234 |
| 45 | राग गायन व चित्रपट गीत – संगीत | डॉ. सरिता इंगळे | 241 |
| 46 | मानवतेचा संदेश देणारे 'प्रकाशवाटा' | सुनिल खैरनार, डॉ. उज्वला देवरे | 245 |
| 47 | समकालीन ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन | डॉ. शारदा मोरे | 248 |
| 48 | विसाव्या शतकातील आदिवासी साहित्य | डॉ. अंजली मस्करेन्हास | 253 |
| 49 | 'आमुसकाळ' या कादंबरीतील शेतकऱ्यांच्या समस्या | डॉ. किशोर पाठक | 259 |
| 50 | मराठी ग्रामीण कथांचा अभ्यास (१९७५ ते १९९० चा कालखंड) | विनोद भालेराव, डॉ.अक्षय घोरपडे | 262 |
| 51 | नव्वदोत्तर स्त्रियांच्या मराठी कवितेतील स्त्रीवादी विचार | डॉ. संजय पाटील | 266 |
| 52 | साहित्य अकादमी पुरस्कृत कवितासंग्रहाची वाङ्मयीन आणि भाषिक वैशिष्ट्ये | प्रा.भारती सोनवणे | 275 |
| 53 | माणसे व समाजाने घट्ट कसं व्हावं? हा संदेश देणारे आत्मचरित्र 'झेप' : एक आकलन | डॉ. भाऊसाहेब गवे | 283 |
| 54 | महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी आणि महात्मा फुले | डॉ. मारोती घुगे | 289 |
| 55 | लोकमान्य टिळक यांचे चतुःसूत्री आंदोलन : एक राष्ट्र बांधणीचा मार्ग | डॉ. राजू सावंत | 297 |

| | | | |
|---|---|---|---|
| 40 | वारकरी साहित्यातील अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार | श्री. जालिंदर येवले | 217 |
| 41 | संत नामदेवांची समाजाभिमुखता | प्रा. डी. एम. बहुरे | 222 |
| 42 | चोखियाची महारी : संत सोयराबाई | डॉ. प्रमोद गारोडे | 225 |
| 43 | किशोर सानप लिखित 'समग्र तुकाराम दर्शन' : एक साक्षेपी स्वरुपाची मांडणी | प्रा. बालासाहेब कटारे | 231 |
| 44 | वाकाटक कालीन चित्रकला | डॉ. जी. एस.पाटील | 234 |
| 45 | राग यमन व चित्रपट गीत – संगीत | डॉ. सरिता इंगळे | 241 |
| 46 | मानवतेचा संदेश देणारे 'प्रकाशवाटा' | सुनिल खैरनार, डॉ. उज्ज्वला देवरे | 245 |
| 47 | समकालीन ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन | डॉ. शारदा मोरे | 248 |
| 48 | विसाव्या शतकातील आदिवासी साहित्य | डॉ. अंजली मस्करेन्हस | 253 |
| 49 | 'कापुसकाळ' या कादंबरीतील शेतकऱ्यांच्या समस्या | डॉ. किशोर पाठक | 259 |
| 50 | मराठी ग्रामीण कथांचा अभ्यास (१९२५ ते १९५० चा कालखंड) | विनोद भालेराव, डॉ.अक्षय घोरपडे | 262 |
| 51 | नव्वदोत्तर स्त्रियांच्या मराठी कवितेतील स्त्रीवादी विचार | डॉ. संजय पाटील | 266 |
| 52 | साहित्य अकादमी पुरस्कृत कवितासंग्रहाची वाङ्मयीन आणि भाषिक वैशिष्ट्ये | प्रा.भारती सोनवणे | 275 |
| 53 | मनाने व मनगटाने घट्ट कसं व्हावं? हा संदेश देणारे आत्मचरित्र 'झेप' : एक आकलन | डॉ. भाऊसाहेब गमे | 283 |
| 54 | महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी आणि महात्मा फुले | डॉ. मारोती घुगे | 289 |


Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 265 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April-2021

# मानवतेचा संदेश देणारे 'प्रकाशवाटा'

**संशोधक विद्यार्थी**
सुनिल त्र्यंबक खैरनार

**मार्गदर्शक**
डॉ. उज्वला देवरे

डॉ. प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्रातून मानवतेचा, अतिथतेचा, माणुसकीचा झरा वाहतो. भारतीय संस्कृती जगात 'अतिथी देवो भव', 'एकत्र कुटुंब पद्धती', आहार, पोशाख, या सर्वच क्षेत्रात मानाचे स्थान मिळवले. मानवाने आज बुद्धीच्या, कलेच्या, भाषेच्या जोरावर आपला विकास केला. आज माणूस माणसातील स्वार्थी, ढोंगी, फसवेगिरी, लबाडी, धूर्तपणा या प्रवृत्तीमुळे माणुसकी विसरत चाललेला दिसतो. अशा या माणुसकीशून्य जगात देखील डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या पत्नी मंदा आमटे यांनी माडिया गोंड या आदिवासींसाठी जे कार्य केले, त्या कार्याच्या आढाव्यावरून आज देखील माणुसकी व मानवतेचे दर्शन घडते. 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्रातून हेमलकसा व सभोवतालच्या प्रदेशातील लोकांसाठी डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या लोकांना शिक्षणातून, आरोग्यातून, शेतीतून प्रकाशाची वाट दाखवतात.

बाबा आमटे व साधनाताई या आपल्या आई-वडिलांकडून सामाजिक सेवेचा वारसा लाभलेल्या कुटुंबात डॉ. प्रकाश आमटे यांचा जन्म झाला. वडील बाबा आमटे यांची इच्छा होती आपल्या मुलांनी मेडिकलचे शिक्षण घेऊन माणुसकीच्या भावनेतून कुष्ठरोगी, आदिवासी यांची आरोग्याची सेवा करावी अशी त्यांना आत्मिक तळमळ वाटत होती. वडिलांच्या इच्छेच्या पुर्ततेसाठी प्रकाश आमटे प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, मेडिकल क्षेत्रातील एम.बी.बी.एस. ची पदवी मिळवतात. बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्र व मध्यप्रदेश यांच्या सीमा रेषेवरील भामरागड जवळील 'हेमलकसा' हे कामाचे ठिकाण निवडतात.

## हेमलकसा येथील आरोग्य सेवा :-

डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या पत्नी डॉ. मंदा आमटे एम.बी.बी.एस. चे शिक्षण घेऊन हेमलकसा या ठिकाणी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आदिवासींसाठी आरोग्य सेवा सुरु करतात. माडिया गोंड या आदिवासींची भाषा वेगळी असल्याने त्यांना मराठी भाषा समजत नाही ही अडचण लक्षात घेऊन डॉ. प्रकाश आमटे त्यांना त्यांच्या भाषेत व सांकेतीक चिन्हांनी त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतात. माडिया गोंड आदिवासी कपडे अतिशय कमी वापरतात. आपण ही त्यांच्याच प्रमाणे वेशभूषा करावी व कपड्यांचा वापर कमी करून आपण त्यांच्यातील एक माणूस आहोत याची जाणीव या आदिवासींना व्हावी म्हणून डॉ. प्रकाश आमटे म्हणतात, " कुडकुडणाऱ्या थंडीत उघडेवागडे वावरणारे गरीब आदिवासी पाहिल्यानंतर आपण पूर्ण कपडे घालतोय याचीही लाज वाटायला लागली. मग अर्धी पांढरी पँट आणि कोपरीसारखा अर्ध्या बाह्यांचा बनियन असे कपडे मी घालायला सुरुवात केली." 1 असा मानवतेच्या भावनेतून भौतिक सुविधांना त्याग करतात.

सुरुवातीला डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या सहकाऱ्यांना पाहून घाबरून पळून जाणारे आदिवासी व डॉ. प्रकाश आमटे व त्यांचे सहकारी हे आपल्या मदत व आपले दुःख, कष्ट कमी करतात. याची जाणिव या आदिवासींना आल्या नंतर येथील आदिवासी स्वतः होऊन आपल्या आरोग्याचे प्रश्न व पेशंटला घेऊन येऊ लागले. येथील आदिवासीन मध्ये पारंपारिक पद्धतीनी अंधश्रद्धा होती. आदिवासी आजारी व्यक्तिला गावातील मांत्रिकाकडे घेऊन जातात. डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी येथील आजारी व्यक्तिसाठी फ्री मध्ये आरोग्य सेवा सुरु केल्या नंतर हळूहळू हे आदिवासी या आरोग्य सेवेचा लाभ घेतात. हेमलकसा या ठिकाणी जाण्यासाठी रस्ते नव्हते नद्या, नाले, ओढे पार करत या ठिकाणा पर्यंत प्रतिकूल परिस्थितीत जावे लागत.



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 265 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April- 2021

आरोग्य सेवा देण्यासाठी कोणत्याही प्रकारची वीजेची सोय नाही, पाणी पुरवठ्याची सोय नाही, पक्क्या दवाखान्याची सुविधा नाही. आधुनिक व अद्ययावत आरोग्य विषयक मशनिरी व साधने उपलब्ध नाही. हे उपलब्ध करण्यासाठी शासनाकडून व कोणत्याही संस्थेकडून वस्तू व निधी पुरवला जात नाही. सर्व मदत ही बाबा आमटे यांच्या आनंदवनातूनच मिळत होती. अशा अतिशय खडतर व प्रतिकूल परिस्थितीत डॉ. प्रकाश आमटे व त्यांचे सहकारी आदिवासींच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी, त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी मानवतेच्या भावनेतून सेवा करतात.

डॉ. प्रकाश आमटे यांचे शिक्षण सामन्य सर्जनचे असल्यामुळे वेगवेगळ्या आजाराचे रुग्ण त्यांच्याकडे उपचारासाठी येतात. या सर्व रुग्णांवर उपचार कसा करावा याचा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहतो. डॉ. प्राकाश आमटे वेगवेगळ्या पुस्तकातून माहिती मिळवून अशा रुग्णांवर ते उपचार करत. हे उपचार रुग्णांकडून कोणतेही फी व औषधांचे बिल न घेता मानवतेच्या भावनेतून या आदिवासींवर ते उपचार करतात. त्यांच्याकडे साप चावलेले, पोटाच्या विकाराचे, अस्वलाने हल्ला केलेले, झाडावरून पडून जखमी झालेले अशा सर्वांच प्रकारचे रुग्ण त्यांचाकडे उपचार करण्यासाठी येतात. प्रकाश आमटे या आदिवासींनी आरोग्याची सेवा करताना त्यांच्यावर अनेक कसोटीचे प्रसंग येतात. त्यामध्ये अस्वलाने हल्ला केलेल्या माणसावर भूल न देतात त्यांच्यावर केलेले उपचार ही मानवतेची भावना व रुग्णाची सहनशीलता दिसते. प्रसूतीसाठी आदिवासी एका स्त्रीला खाटेवर झोपवून डॉ. प्रकाश आमटे यांच्या आरोग्य विभागात दाखल करतात. त्या स्त्रीची शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असणारी सुविधा नाही. डॉ. प्रकाश आमटे त्यांना शस्त्रक्रिया करण्यासाठी चंद्रपूरला जाण्याचा सल्ला देतात. आदिवासी व त्यांच्या नातेवाईकांचा त्यांच्यावर विश्वास असल्यामुळे ते डॉ. प्रकाश आमटे यांना म्हणतात. "अशा पावसात आम्ही दुसरीकडे कुठे जाणार ? आमच्याकडे पैसे नाहीत, भाषाही येत नाही. तुमच्याकडे विश्वासाने आलोय. तुम्हीच काही तरी करा." [२] अशी विनवणी करतात. आदिवासींचा असलेला विश्वास व मानवता यांच्या आधाराने डॉ. प्रकाश आमटे त्या स्त्रीचा जीव वाचवण्यासाठी असलेल्या साधनांच्या साह्याने पहिली प्रसूतीची शस्त्रक्रिया त्या मुलाला कापून बाहेर काढतात. या शस्त्रक्रियेमुळे त्या आदिवासी स्त्रीचे प्राण वाचतात. असे अनेक कसोटीचे प्रसंग डॉ. प्रकाश आमटे यांच्या जीवनात येतात.

डॉ. प्रकाश आमटे आणि त्यांचे सहकारी आदिवासींच्या मनात विश्वास प्रेम, जिव्हाळा निर्माण करतात या प्रदेशातील आदिवासी पर्यंत चपला व इतर साधने पोहचलेली नाही. त्यामुळे या प्रदेशात गळू होणे हा सामान्य प्रकार मानला जात. एखाद्या पेशंटला जर चालता नाही आले तरच ते दवाखान्यात उपचार करण्यासाठी जात. आहिरी गावाचे पेशंटस् उपचार करण्यासाठी डॉ. प्रकाश आमटे यांच्या दवाखान्यात येतात. आहिरी हे गाव तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे ग्रामीण रुग्णालय असून देखील ते पेशंट उपचार करण्यासाठी दूर वरून या दवाखान्यात येतात. प्रकाश आमटे त्याला विचारतात. "एवढ्या लांब का आलास बाबा ?" असं विचारल्यावर तुमच्या कडूनच उपचार करून घ्यायचे." [३] असं म्हणाला. या वरून आदिवासींचा डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या सहकाऱ्यावर असलेला विश्वास, आत्मियता, मानवता दिसते.

डॉ. प्रकाश आमटे आदिवासींनसाठी देवदूत बनले होते. येथील प्रदेश जंगलाचा असल्या कारणाने व फळे तोडण्यासाठी येथील आदिवासी नेहमीच झाडावर चढताना पडून हाडे मोडतात. असे अनेक पेशंट त्यांच्या दवाखान्यात येतात. त्यांच्यावर योग्य पध्दतीने उपचार डॉ. प्रकाश आमटे व त्यांचे सहकारी करतात. डॉ. प्रकाश आमटे अस्थिरोगतज्ज्ञ नसताना देखील मानवतेच्या भावनेतून आदिवासींचे दुःख दूर करण्यासाठी त्यांच्यावर उपचार करतात. डॉ. प्रकाश आमटे नेत्रविकार तज्ज्ञ नसताना देखील पेशंट्सचे दुःख बघून या आदिवासींच्या डोळ्यांवर उपचार सुरु करतात. भाऊ विकास आमटे यांच्या सहकार्याने व त्यांच्याकडील माहिती घेऊन व पुस्तकातील माहितीच्या आधारे एका आदिवासी स्त्रीच्या डोळ्यावर मोतीबिंदू ची शस्त्रक्रिया करतात. मनातील दडपण व डोळा हा अवयव नाजूक असल्याने डॉ. प्रकाश आमटे यांना त्या रात्री त्या स्त्रीच्या

E-ISSN :
2348-7143
April- 2021

काळजीने झोप येत नाही. सोबीग तागांनी पट्ट्या काढल्या नंतर प्रकाश आमटे तिच्यापुढे दोन बोटं धरून तिला विचारतात. "ही किती बोटं?" त्या स्त्रीला पस्त डोळ्यांनी दिसू लागल्यामुळे डॉ. प्रकाश आमटे यांना परमानंद होतो. पुढे प्रकाश आमटे आदिवासींच्या डोळ्यांच्या मोतीबिंदूच्या असंख्य शस्त्रक्रिया करतात.

**डॉ. प्रकाश आमटे यांची प्राण्याविषयी असलेली भूतदया :-**

हेमलकसा हे ठिकाण संपूर्ण जंगलाचा प्रदेश असल्यामुळे येथे प्राण्यांची संख्या जास्त होती. या प्रदेशातील आदिवासी सतत प्राण्यांची शिकार करून आपला उदरनिर्वाह करतात. या प्राण्यांच्या शिकारी विषयी डॉ. प्रकाश आमटे या आदिवासींमध्ये जागृकता निर्माण करतात. आदिवासींना प्राण्यांची छोटी पिल्लं न मारता आमच्याकडे आणून सोडण्यासाठी सांगतात. सुरुवातीला प्रकाश आमटे 'बबली' या माकडाच्या पिल्लाला आदिवासींना धान्य देऊन त्याची देखभाल करतात. 'बबली' आणि 'काळू' कुत्रा यांच्यात मैत्रीची घट्ट वीण तयार होते. बबली काळूच्या पाठीवर बसून रेटित फिरते. हे दृश्य बघण्यासाठी आदिवासी लोक येतात. पुढे हेच आदिवासी मारलेल्या प्राण्यांच्या पिल्लांना डॉ. प्रकाश आमटे यांच्या प्राण्यांच्या गोकुळात आणून सोडतात.

या प्रादेशामध्ये 'देवखारी' या नावाच्या खूप खारी आहे. शाळेतील मुले या खारी मारतात. डॉ. प्रकाश आमटे या शाळेतील आदिवासींच्या मुलांना प्राण्यांना सांभाळणे, खाऊ घालणे, त्यांच्याशी खेळणे अशी कामे सोपल्यामुळे या मुलांना प्राण्यांविषयी प्रेम निर्माण झाले व प्राण्यांच्या शिकारी देखील बंद झाल्या. डॉ. प्रकाश आमटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्राण्यांचे अनाथालय सुरु करतात. या प्राण्यांच्या अनाथलयामध्ये पुढे 'राणी' 'अस्वल', 'नेगल', 'बिबट्या', 'नेगली', 'हेमल', 'राजा', 'मुन्ना' असे बिबटे व वाघ त्यांच्या प्राण्यांच्या गोकुळात पुढे होत गेले. डॉ. प्रकाश आमटे यांनी सापान विषयी देखील ज्ञान मिळविले होते. विषारी व बिनविषारी सापांचे त्यांना ज्ञान होते. साप पकडण्याची कला त्यांना अवगत होती. असे अनेक साप त्यांनी पाळले. जास्तीचे साप जंगलात नेऊन सोडून दिले. डॉ. प्रकाश आमटे यांच्या प्राण्यांच्या गोकुळात ६० ते ६५ प्राणी गुण्या गोविंदाने नांदत आहेत. माकड, कुत्रा, बिबट्या, मुंगूस असे नेहमीचे एकमेकांचे शत्रू असलेले प्राणी इथे मात्र मित्र म्हणून राहतात. या सर्वांचे एक कुटुंबच बनले आहे. सॅली बाकर नावाच्या अमेरिकन स्त्रीने या गोकुळाला भेट दिल्या नंतर या गोकुळाला 'आमटेज ॲनिमल आर्क' असे नाव दिले. अशी मानवता, प्रेम, दयाभाव, डॉ. प्रकाश आमटे यांच्या ठिकाणी दिसते.

डॉ. प्रकाश आमटे व त्यांचे सहकारी या आदिवासींना माणूस म्हणून जगता यावे यासाठी आदिवासींच्या मुलांना शिक्षण दिल्या शिवाय पर्याय नाही त्यासाठी स्वतःशाळा सुरु करतात. आदिवासींना शेती करण्याचे ज्ञान देतात. शेतीसाठी लागणारे बियाणे पुरवतात. त्यांच्या मधिल आपआपसात होणारे भांडणे सोडविण्यासाठी हे आदिवासी प्रकाश आमटे यांच्याकडे येतात. त्यांचे प्रश्न, समस्या, भांडणे सोडविण्यासाठी डॉ. प्रकाश आमटे लोकअदालत भरवतात. अशी सर्व प्रकारची मदत या आदिवासींना डॉ. प्रकाश आमटे करतात. यावरून डॉ. प्रकाश आमटे आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचे प्रकाश सूर्यच बनलेले आहे.

**संदर्भ :-**

१. डॉ. प्रकाश आमटे, 'प्रकाशवाटा', ३८ वी आवृत्ती, १ मे २०१८ समकालीन प्रकाशन पुणे, पृ. क्र. - ५०
२. डॉ. प्रकाश आमटे, 'प्रकाशवाटा', ३८ वी आवृत्ती, १ मे २०१८ समकालीन प्रकाशन पुणे, पृ. क्र. – ५४
३. डॉ. प्रकाश आमटे, 'प्रकाशवाटा', ३८ वी आवृत्ती, १ मे २०१८ समकालीन प्रकाशन पुणे, पृ. क्र. – ५५
४. डॉ. प्रकाश आमटे, 'प्रकाशवाटा', ३८ वी आवृत्ती, १ मे २०१८ समकालीन प्रकाशन पुणे, पृ. क्र. - ६०



Scanned with OKEN Scanner